दावा दाखल तारीख : २६/११/२०१३
दावा नोंद तारीख : २६/११/२०१३
दावा निकाल तारीख : ३०/०६/२०१७
कालावधी : वर्षे महिने दिवस
**३ ७ ४**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात**

( पीठासन अधिकारी : गिरीश सु. माने )

**नियमित दिवाणी दावा क्र. ६९/२०१३** **निशाण क्र. ७६**

| | |
|---|---|
| रविंद्र भगवान परब,<br>वय — ५० वर्षे, व्यवसाय — शेती,<br>रा. — मु.पो.पाटथर मारुती मंदिर, ता. — देवगड<br>जि. — सिंधुदूर्ग. | वादी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. | पांडूरंग जिवबा परब,<br>वय — ६५ वर्षे, व्यवसाय — शेती, | |
| २. | राजेंद्र भगवान परब,<br>वय — ४६ वर्षे, व्यवसाय — शेती, | प्रतिवादी |
| ३. | शिवराम भगवान परब,<br>वय — ४० वर्षे, व्यवसाय — शेती, | |
| ४. | सुरेंद्र भगवान परब,<br>वय — ३८ वर्षे, व्यवसाय — शेती, | |
| ५. | भागिर्थी भगवान परब,<br>( नि. क्र. ६८ वरील आदेशाप्रमाणे नाव कमी ) | |
| ६. | सत्यवान नारायण परब<br>वय — ४० वर्षे, व्यवसाय — शेती, | |

७. श्रीमती लता विजय पवार,
वय — ४८ वर्षे, व्यवसाय — घरकाम,

८. श्रीमती ज्योती शशिकांत कदम,
वय — ४२ वर्षे, व्यवसाय — घरकाम,
अ.क्र. १ ते ८ रा. — पाटथर मारुतीमंदिर,
ता. — देवगड, जि. — सिंधुदूर्ग.

९. सौ. सुहासिनी श्यामसुंदर धुरी, प्रतिवादी
वय — ५८ वर्षे, व्यवसाय — घरकाम,
रा. — मु.पो.खुडी पन्हळीवाडी, ता. — देवगड,
जि. — सिंधुदूर्ग.

१०. श्री. शाहू पांडूरंग परब,
वय — ३५ वर्षे, व्यवसाय — शेती,
रा. — मु.पो. पाटथर, ता. — देवगड,
जि. — सिंधुदूर्ग.

**दावा — वाटप व पृथक कब्जासाठी, निरंतर व्यादेशासाठी**

=====================================================

| | |
|---|---|
| वादी तर्फे विधिज्ञ | :— श्री.ए.ए.गोगटे |
| प्र.वादी क्र १, ६ व १० तर्फे विधिज्ञ | :— श्री.ए.एम.माणगावकर |
| प्र.वादी क्र. ५, ७ ते ९ | :— एकतर्फा |
| प्र.वादी क्र. २ ते ४ तर्फे विधिज्ञ | :— श्री.ए.एम.माणगावकर ( वकीलपत्र रद्द ) |

=====================================================

## न्यायनिर्णय

( दिनांक ३० जून २०१७ रोजी घोषित )

### दाव्यातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे

मौजे — पाटथर, तालुका — देवगड, जिल्हा — सिंधुदूर्ग येथील खालील वर्णनाच्या मिळकती :

## परिशिष्ट अ

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | हि.क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | १७ (८२) | ३/६ | ०—०२.० |
| २ | २७ (८४) | २ | ०—४३.०<br>०—०५.० |
| ३ | १९ (१४३) | ४/६ | ०—२०.०<br>०—०२.० |

## परिशिष्ट 'ब'

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | हि.क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | ५ (७२) | ३५/७ | ०—०१.० |

## परिशिष्ट 'क'

१. मौजे — पाटथर, तालुका — देवगड, जिल्हा — सिंधुदूर्ग येथील ग्रामपंचायत घर क्र. २२७ (१६३) चा दगड मातीचा घर इमला.

२. मौजे — पाटथर, तालुका — देवगड, जिल्हा — सिंधुदूर्ग येथील ग्रामपंचायत घर क्र. २२८ (१६४) चा चिरेबंदी पत्र्याचा घर इमला.

२. वर नमूद मिळकती यापुढे दावा मिळकती म्हणून नमूद केल्या आहेत. वादी प्रतिवादींचा मुळ पुरुष भिकाजी हा होता. भिकाजी यास जिवबा व गोविंद अशी दोन मुले होती. जिवबा याला प्रतिवादी क्र. १ व भगवान अशी दोन मुले होती. त्यापैकी भगवान हा मयत असून वादी व प्रतिवादी २ ते ५ हे भगवान यांचे हयात वारस आहेत. भिकाजी याचा दुसरा मुलगा गोविंद याला नारायण नावाचा मुलगा होता. प्रतिवादी क्र. ६ ते ९ हे नारायण याचे हयात वारस आहेत. नारायण याची पत्नी लक्ष्मीबाई मयत

आहे. जिवबा व गोविंद दरम्यान यापूर्वीच वाटप झाले असून दावा परिशिष्ट ब मिळकत घरभाट असल्याने ती सामाईक ठेवण्यात आली होती. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या संयुक्त मालकीच्या मिळकती असून त्यात वादी व प्रतिवादी यांच्या हिश्श्यानुरुप स्वतंत्र वहिवाटी सुरु आहेत. वादी प्रतिवादींचे मुळ पुरुष भिकाजी हे हयात असताना त्यांनी जिवबा व गोविंद या दोन मुलांच्या दरम्यान त्यांचे सर्व मिळकतींचे वाटप केले आहे. त्याप्रमाणे दावा परिशिष्ट अ मिळकती या वादी व प्रतिवादी १ ते ५ यांचे पुर्वाधिकारी जिवबा यांचे हिश्श्यास देणेत आल्या आहेत. सदर मिळकतींशी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा कोणताही हक्कसंबंध नाही. दावा परिशिष्ट ब मिळकत ही घरभाटाची मिळकत असून तेथे वादी प्रतिवादींची समाईक राहती घरे आहेत. सदर मिळकतीपुरताच प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा हक्कसंबंध असल्यामुळे त्यांना याकामी पक्षकार केले असून त्यांचा दावा मिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नाही. दावा परिशिष्ट क मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची समाईक घरे असून त्यात वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचा निम्मा हिस्सा आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ आणि प्रतिवादी क्र. १ चे दरम्यान स्वतंत्र वहिवाटी चालू होत्या. असे असले तरी सदर मिळकतीचे सातबारा सदरी सर्वांची नावे दाखल असल्याने व हद्दीमेरेनिशी वाटप झाले नसल्याचा गैरफादा घेवून प्रतिवादी क्र. १ हा वादीस जाणीवपूर्वक त्रास देणेच्या हेतूने दावा मिळकतीमधील वादीचे वहिवाटीस हरकत व अडथळा करु लागला. त्यामुळे वादीने दिवाळीचे दरम्यान प्रतिवादी क्र. १ यास दावा मिळकतीचे हद्दीमेरेनिशी वाटप करुन देणेबाबत विचारले असता प्रतिवादी क्र. १ ने उडवाउडवीची उत्तरे दिली. सबब, वादीने दावा मिळकतींचे वाटप होवून त्याच्या हिश्श्याचा कब्जा मिळणेसाठी व दावा मिळकतीमधील त्याचे वहिवाटीस प्रतिवादी क्र. १ याने हरकत व अडथळा करु नये यासाठी निरंतर व्यादेशाकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ३१ ला कैफियत दाखल करुन दाव्यातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार जिवबा व गोविंद यांच्या दरम्यान वाटप झाले नाही. परिशिष्ट अ मधील मिळकती जिवबा याच्या हिश्श्यास देण्यात आल्या नाहीत. दावा मिळकतीचे हद्दीमेरेनिशी वाटप झालेले नसल्याने वादी म्हणतो तशी त्यांची स्वतंत्र वहिवाट कधीही नव्हती अगर त्याने कधीही स्वतंत्र शेतघर बांधलेले नाही. तसेच दावा मिळकतीत वादीने कोणत्याही सुधारणा केलेल्या नाहीत. वादी प्रतिवादींचे वास्तव्य पुर्वीपासूनच स्वतंत्र आहे व त्यांच्या आपसात समजुतीने वहिवाटी चालू आहेत. त्याप्रमाणे कै. भगवान व प्रतिवादी क्र. १ पांडूरंग यांनी आपल्या शाखेचे क्षेत्र आपसात समजुतीने वाटून घेतले होते व त्याप्रमाणे त्यामध्ये त्यांच्या वहिवाटी चालू होत्या व आहेत. वादी याने तो राहत असलेल्या घराची दुरुस्ती केल्यानंतर त्याला प्रतिवादी क्र. १ च्या वहिवाटीच्या क्षेत्रातून वाटेचा हक्क हवा होता. वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या वहिवाटीच्या क्षेत्रात त्यांना जाण्या येण्यासाठी स्वतंत्र मार्ग होते. मात्र आपल्या वहिवाटीच्या क्षेत्राचा विचार न करता वादीने घर इमले बांधले अगर मोठया प्रमाणात सुधारणा केल्या. त्यामुळे वहिवाटीच्या क्षेत्रातून असलेल्या वाटा अरुंद झाल्या आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या वहिवाटीच्या क्षेत्रामध्ये वादी हक्क सांगू लागला व प्रतिवादी क्र. १ च्या वहिवाटीच्या क्षेत्रात हरकत करु लागला. प्रतिवादी क्र. १ कडे प्रत्यक्ष वहिवाटीस असलेले क्षेत्र त्याच्या हिश्श्यापेक्षा कितीतरी कमी आहे व त्यात त्यांची कलमबाग आहे. वादीच्या गडगा व कुंपण तोडण्याच्या कृत्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या कलम बागेचे नुकसान होवू लागले आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याला आपल्या वहिवाटीच्या क्षेत्राभोवती वारंवार कुंपणं करावी लगतात. अशा प्रकारे वाटपाचा दावा दाखल करुन प्रतिवादी क्र. १ च्या वहिवाटीचे क्षेत्र बळजबरीने बळकावून त्याद्वारे न्यायालयाकडून समन्यायीक दाद प्राप्त करण्याचा प्रयत्न करावयाचा या उद्देशाने वादीने सदरील खोटा व खोडसाळ दावा दाखल

केला आहे. वादी यास वडीलार्जीत मिळकतीतील शेतीच्या उत्पन्ना व्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. वादी रहात असलेले ग्रामपंचायत घर क्र. (३१३) ६१ चा इमला हा सुध्दा वडीलार्जीत शेतीच्या उत्पन्नातून बांधलेला इमला आहे. वादीने तो बळजबरीने बळकावून त्यात आपले वास्तव्य सुरु केले आहे. सबब, सदरचा इमला या दाव्याच्या कामी सामील केल्याशिवाय सदरचा दावा चालण्यास पात्र नाही. दावा मिळकतीपैकी परिशिष्ट क अ.क्र. २ ची मिळकत पुर्णपणे मोडून पडलेल्या गोठयाचा इमला होता. तो प्रतिवादी क्र. १ चा मुलगा शाहू पांडूरंग परब याने स्वतःच्या उत्पन्नातून पायापासून दुरुस्त केला व त्यात त्याचे वास्तव्य आहे. त्यासाठी येणारा सर्व खर्च प्रतिवादी क्र. १ च्या मुलग्याने केला आहे आणि म्हणूनच वादीसह सर्व हिस्सेदारांच्या संमत्तीने त्या इमल्यास प्रतिवादी क्र. १ च्या मुलाचे नाव दाखल ही झालेले आहे. यदाकदाचित सदरील इमला हा वडीलार्जीत असल्याने वादी व प्रतिवादी यांना हिस्सा देणे आवश्यक आहे असे दिसून आल्यास प्रतिवादी क्र. १ च्या मुलाने केलेला खर्च वादी व अन्य प्रतिवादीकडून त्यास देवविण्याचा आदेश करण्यात यावा. जिवबा व गोविंद यांचेमध्ये वाटा झाले नाही. त्यामुळे मुळ पुरुष भिकाजी यांच्यापासून चालत आलेल्या सर्व मिळकती व इमले याकामी समाविष्ट केल्याशिवाय हा दावा चालण्यास पात्र नाही. दावा परिशिष्ट अ मधील स.क्र. २७ (८४) हि.क्र. २ ची मिळकत प्रतिवादी क्र. १ ची स्वतंत्र कुळ वहिवाटीची मिळकत असून ती त्यांना कुळ कायदयाचे कलम ३२ग प्रमाणे विक्री होवून कलम ३२म प्रमाणे प्रमाणपत्रही मिळाले आहे व ती मिळकत समाईक मिळकत नाही. त्यामुळे ती वाटपास पात्र नाही. त्यात असलेली कलमे व बोअरवेल प्रतिवादी क्र. १ च्या एकटयाच्या मालकी व कब्जे वहिवाटीच्या आहेत. मात्र प्रतिवादी क्र. १ च्या अशिक्षीत व वृध्दपणाचा गैरफायदा घेवून वादी याने आपल्या व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी खोडसाळपणे करुन घेतली आहे. दाव्यास कोणतेही कारण

घडले नाही. दावा मिळकतीचे वाटप करावयाचे झाल्यास आता असलेल्या वहिवाटी कायम ठेवून व ज्या हिस्सेदारांनी आपल्या वहिवाटीच्या क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत ते क्षेत्र त्यांच्या हिश्श्यास नेमून वाटप करण्याचा आदेश व्हावा. सबब, दावा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

४.　　प्रतिवादी क्र. १० याने निशाण क्र. ६० ला कैफियत दाखल करुन दाव्यातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार घर क्र. २२७ व २२८ हे दोन इमले फार पुर्वीपासून जिवबा व गोविंद यांच्या नावे नोंदविले होते. त्यापैकी ग्रामपंचायत घर क्र. २२७ चा इमला कै. गोविंद भिकाजी परब यांच्या नावे नोंदविला होता, तर घर क्र. २२८ चा इमला कै. जिवबा भिकाजी परब यांच्या नावे नोंदविला होता. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांनी समाईक उत्पन्नातून वेगवेगळे इमले, वेगवेगळया ठिकाणी बांधल्यानंतर ग्रामपंचायत घर क्र. २२८ चा इमला वापराअभावी पुर्णपणे मोडकळीस आला. या परिस्थितीत ग्रामपंचायत घर क्र. २२८ ची संपूर्ण दुरुस्ती सर्वांच्या जाणीवेने व स्वत:साठी स्वत:च्या खर्चाने प्रतिवादी क्र. १० यांनी केली असून त्यात त्यांचे वास्तव्य आहे. यासाठी प्रतिवादी क्र. १० व्यतिरिक्त अन्य कोणीही कोणत्याही स्वरुपात खर्च केलेला नाही. सबब, सदरील इमला वाटपास पात्र नाही. यदाकदाचित सदरील इमला वाटपास पात्र आहे असे दिसून आल्यास प्रतिवादी क्र. १० ने सदर इमल्याच्या बांधकामास केलेल्या संपूर्ण खर्चाची रक्कम वादी व प्रतिवादीकडून वसूल होवून मिळावी. ग्रामपंचायत घर क्र. २२७ चा इमला हा गोविंद शाखेच्या नावे फार पुर्वीपासून नोंदविला होता. तो केवळ गोविंद शाखेच्या कब्जे वहिवाटीस फार पूर्वीपासून होता. त्याप्रमाणे त्यांची नावे अधिकार अभिलेखाला दाखल झाली होती व आहेत. सदरील इमला गोविंद शाखेच्या लोकांनी प्रतिवादी क्र. १ यास विनामोबदला दिला व त्याप्रमाणे अधिकार अभिलेखास प्रतिवादी क्र.

१ चे नाव दाखल झाले. अशा प्रकारे दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्र. २२७ च्या इमल्याकडे प्रतिवादी क्र. १ वगळता अन्य कोणाचाही हक्कसंबंध राहिला नव्हता व नाही. वादी प्रतिवादी यांच्या वहिवाटी गेली काही वर्षे स्वतंत्र आहेत हे विधान खोटे आहे. वादी हा अन्य हिस्सेदारांना त्रास देवू लागला, त्याने वहिवाटीबाबत वाद निर्माण करुन सदरील खोटा व खोडसाळ दावा दाखल केला आहे. वादीच्या नावे नोंदविलेला ग्रामपंचायत घर क्र. (३१३) ६१ चा इमला तसेच प्रतिवादी क्र. ४ च्या नावे नोंदविलेला ग्रामपंचातय घर क्र. (५९) १२ चा इमला तसेच प्रतिवादी क्र. २ च्या नावे नोंदविलेला ग्रामपंचायत घर क्र. (५७) ११ चा इमला हे सर्व इमले कुटूंबाच्या पैशातून, कुटूंबाकरीता बांधलेले इमले होते व आहेत. सबब, सदरील इमले या दाव्याच्या कामी सामील केल्याशिवाय सदरील दावा चालण्याजोगा नाही. सबब, वर नमूद सर्व इमले या दाव्याच्या कामी सामील न केल्यास वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. एवढेच नव्हे तर प्रतिवादी क्र. ३ च्या नावे बांधलेला इंदिरा आवास योजनेतील इमल्याला सुध्दा कुटूंबाच्या पैशातून आर्थिक मदत करण्यात आली होती. इंदिरा आवास योजनेद्वारे नमूद केलेल्या आकारापेक्षा कितीतरी मोठया आकाराचा इमला प्रतिवादी क्र. ३ यांनी बांधलेला आहे आणि त्यामुळे शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून सदरचा इमला पूर्ण होणे शक्य नव्हते, यासाठी कुटूंबाने कुटूंबाच्या पैशातून आर्थिक मदत केली होती व आहे. प्रतिवादी क्र. ३ यास दावा मिळकतीतील शेती व्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. सबब, सदरील इमला व त्या खालील क्षेत्र या दाव्याच्याकामी सामील होणे आवश्यक आहे. या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादीने दावा फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. ६ याने निशाण क्र. ६५ ला कैफियत दाखल करुन दाव्यातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याच्या

म्हणण्यानुसार जिवबा व गोविंद यांच्या दरम्यान वाटप झाले नाही. परिशिष्ट अ मधील मिळकती जिवबा याच्या हिश्श्यास देण्यात आल्या नाहीत. घर क्र. २२७ व २२८ हे दोन इमले फार पुर्वीपासून जिवबा व गोविंद यांच्या नावे नोंदविले होते. त्यापैकी ग्रामपंचायत घर क्र. २२७ चा इमला कै. गोविंद भिकाजी परब यांच्या नावे नोंदविला होता, तर घर क्र. २२८ चा इमला कै. जिवबा भिकाजी परब यांच्या नावे नोंदविला होता. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांनी समाईक उत्पन्नातून वेगवेगळे इमले, वेगवेगळया ठिकाणी बांधल्यानंतर ग्रामपंचायत घर क्र. २२८ चा इमला वापराअभावी पुर्णपणे मोडकळीस आला. या परिस्थितीत ग्रामपंचायत घर क्र. २२८ ची संपूर्ण दुरुस्ती सर्वांच्या जाणीवेने व स्वत:साठी स्वत:च्या खर्चाने प्रतिवादी क्र. १० यांनी केली असून त्यात त्यांचे वास्तव्य आहे. यासाठी प्रतिवादी क्र. १० व्यतिरिक्त अन्य कोणीही कोणत्याही स्वरुपात खर्च केलेला नाही. सबब, सदरील इमला वाटपास पात्र नाही. यदाकदाचित सदरील इमला वाटपास पात्र आहे असे दिसून आल्यास प्रतिवादी क्र. १० ने सदर इमल्याच्या बांधकामास केलेल्या संपूर्ण खर्चाची रक्कम वादी व प्रतिवादीकडून वसूल होवून मिळावी. ग्रामपंचायत घर क्र. २२७ चा इमला हा गोविंद शाखेच्या नावे फार पुर्वीपासून नोंदविला होता. तो केवळ गोविंद शाखेच्या कब्जे वहिवाटीस फार पूर्वीपासून होता. त्याप्रमाणे त्यांची नावे अधिकार अभिलेखाला दाखल झाली होती व आहेत. सदरील इमला गोविंद शाखेच्या लोकांनी प्रतिवादी क्र. १ यास विनामोबदला दिला व त्याप्रमाणे अधिकार अभिलेखास प्रतिवादी क्र. १ चे नाव दाखल झाले. अशा प्रकारे दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्र. २२७ च्या इमल्याकडे प्रतिवादी क्र. १ वगळता अन्य कोणाचाही हक्कसंबंध राहिला नव्हता व नाही. आजदेखील सदरचा इमला प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात आहे. सदर इमला जर प्रतिवादी क्र. १ यास प्राप्त होत नसेल तर तो इमला केवळ प्रस्तुत प्रतिवादीच्या मालकी व कब्जे वहिवाटीचा असल्याने तो वाटपास पात्र नाही. सबब, या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादीने दावा

फेटाळण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना पुरेशी संधी मिळून देखील त्यांनी कैफियत सादर केली नाही. त्यामुळे निशाण क्र. १ वरील आदेशान्वये सदरचे प्रकरण त्यांचे कैफियती विना चालविणेत आले आहे.

७. प्रतिवादी क्र. ५, ७ ते ९ यांना समन्सची बजावणी होवून देखील ते याकामी गैरहजर राहिले. त्यामुळे निशाण क्र. १ वरील आदेशान्वये सदरचे प्रकरण त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले आहे.

८. उभय पक्षकारांच्या वादातीत कथनावरुन माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि. ४३ ला खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित केले आहेत. सदर मुद्दयांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | जिवबा व गोविंद यांच्यामध्ये पुर्वी वाटप झाले होते असे वादीने शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| २ | दावा मिळकती एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत असे वादीने शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| ३ | दावा परिशिष्ट क अ.क्र. २ ची मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या मुलाने त्याचे स्वउत्पन्नातून बांधल्याचे प्रतिवादी क्र. १ ने शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ४ | दावा परिशिष्ट अ अ.क्र. २ ची मिळकत प्रतिवादी क्र. १ ची स्वतंत्र कुळ वहिवाटीची मिळकत असल्याचे त्याने शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ५ | आवश्यक मिळकती अभावी दाव्यास बाधा येते का ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ६ | वादी त्याच्या हिश्श्याचे वाटप होवून त्याप्रमाणे पृथक कब्जा मिळणेस पात्र आहे का? | होकारार्थी |
| | असल्यास, प्रत्येक पक्षकारांचा हिस्सा किती ? | अंतिम आदेशाप्रमाणे |
| ७ | आदेश व हुकूमनामा काय ? | दावा अंशत: मंजूर करणेत येतो. |

**कारणमिमांसा**

९. दाव्यातील कथनांच्या पुष्ठयर्थ वादी रविंद्र भगवान परब याने निशाण क्र. ६९ ला तोंडी पुरावा सादर केला आहे. याशिवाय वादीने खालील नमूद कागदपत्रे दाखल केली आहेत :

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | ७/१२ उतारे | ६ ते ९ |
| २ | कर आकारणी यादीचे उतारे | १०, ११, ३५ ते ३९ |
| ३ | फेरफार उतारे | १२, १३, ७५ |

१०. प्रतिवादी क्र. १, ६ व १० यांनी त्यांना तोंडी पुरावा द्यायचा नाही अशी पुरसीस निशाण क्र. ७२ ला दाखल केली आहे. नमूद कागदपत्रे दाखल केली आहेत :

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | खरेदीचे प्रमाणपत्र | ४९ |
| २ | कर आकारणी यादीचा उतारा | ५० |

११. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना पुरेशी संधी मिळून देखील त्यांनी पुरावा दिला नाही. त्यामुळे निशाण क्र. १ वरील आदेशान्वये त्यांचा पुरावा बंद करणेत आला आहे.

१२. वादी, प्रतिवादी क्र. १, ६ व १० तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

## मुद्दा क्र. १ करीता

१३. निशाण क्र. १३ ला असलेल्या फेरफार क्र. ३५६० अन्वये जिवबा भिकाजी परब मयत झाल्यामुळे त्यांचे वारस प्रतिवादी क्र. १, भगवान परब यांच्या नावाची नोंद दावा परिशिष्ट अ मधील मिळकतींना झाल्याचे दिसून येते. निशाण क्र. ७५ ला असलेल्या फेरफार उता—यावरुन गोविंद याचा मुलगा नारायण मयत झाल्यानंतर त्याचे वारस प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या नावाची नोंद सर्व्हे क्र. १९ हि.क्र. ४/५, सर्व्हे क्र. १९ हि.क्र. ४/७, सर्व्हे क्र. १७ हि.क्र. ३/५, सर्व्हे क्र. ५ हि.क्र.३५/७, सर्व्हे क्र. २७ हि.क्र. ४ या मिळकतींना नोंद झाल्याचे दिसून येते. सदरचे दोन्ही फेरफार नारायण व जिवबा यांचे वारस तपासणीबाबतचे आहेत असे दिसून येते. जरी नारायणचे वारस व जिवबा यांचे वारस यांच्या नावाची नोंद वेगवेगळया मिळकतींना झाली असली तरी देखील केवळ या फेरफार नोंदीवरुन दावामिळकती जिवबा याच्या हिश्श्याला वाटून देण्यात आल्या होत्या व निशाण क्र. ७५ च्या फेरफारमध्ये नोंद असलेल्या मिळकती गोविंद याच्या हिश्श्याला वाटून देण्यात आल्या होत्या असा निष्कर्ष काढता येणार नाही. केवळ अशा फेरफारमधील नोंदीवरुन जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले होते हे ठरविता येणार नाही.

१४. जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले होते, त्याप्रमाणे फेरफार मंजूर झाला व त्यान्वये सदर वाटपाचा अंमल दावा मिळकतीमधील अधिकार अभिलेखात झाला असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही.

१५. वादी याने त्याच्या उलट तपासामध्ये दावा परिशिष्ट अ मधील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा देखील हिस्सा आहे असे स्पष्टपणे कबूल केले आहे. त्याच्या या कबूलीवरुन दावा परिशिष्ट अ मधील मिळकतीमध्ये गोविंद याचे वारस प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा हिस्सा आहे हे स्पष्ट होते. जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले असते तर गोविंद याचे वारस प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा परिशिष्ट अ मधील मिळकतीमध्ये हिस्सा असण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. ज्याअर्थी परिशिष्ट अ मधील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा हिस्सा आहे असे वादीने उलट तपासामध्ये सांगितले आहे, त्याअर्थी जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले हाते व त्या वाटपा दरम्यान परिशिष्ट अ मधील मिळकती जिवबा याच्या हिश्श्याला वाटून देण्यात आल्या होत्या असे मुळीच वाटत नाही. परिणामी जिवबा व गोविंद यांच्यामध्ये पूर्वी वाटप झाले होते हे शाबीत होत नाही. सबब, मी मुद्‌दा क्र. १ चा निष्कर्ष नकरार्थी नोंदवत आहे.

## <u>मुद्‌दा क्र. २ करीता</u>

१६. दावा मिळकती एकत्र कुटूंबाच्या असल्याबाबत प्रतिवादी क्र. १, ६ व १० यांनी कैफियतीमध्ये स्पष्टपणे नाकारल्याचे दिसून येत नाही. सदर मिळकती कुठल्याही एका सदस्याच्या स्वसंपादीत मिळकती आहेत असे सदर प्रतिवादींचे कथन नाही. वादी याने पुराव्यामध्ये सदर मिळकती एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत असे स्पष्टपणे सांगितले आहे. तसेच प्रतिवादींमार्फत वादी याला उलट तपासामध्ये दावा मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा देखील हिस्सा आहे असे सुचविण्यात आले आहे. सबब, या सर्व बाबींवरुन दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत हे शाबीत होते. परिणामी मी मुददा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. ३ करीता

१७. परिशिष्ट क मधील अ.क्र. २ ची मिळकत म्हणजेच ग्रामपंचायत घर क्र. २२८ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ चा मुलगा प्रतिवादी क्र. १० याने स्वउत्पनातून बांधली आहे असे प्रतिवादी क्र. १ व १० यांचे कथन आहे. मात्र प्रतिवादी क्र. १ अगर प्रतिवादी क्र. १० यांनी त्याबाबत कसलाही पुरावा सदर केला नाही. वादी याने उलट तपासामध्ये सदर घर बांधण्यास किती खर्च आला हे त्याला सांगता येणार नाही, सदर खर्चाचा हिशोब त्याने पाहिला नाही, प्रत्येक हिस्सेदाराला किती खर्च आला हे त्याला सांगता येणार नाही, सदरचे घर पुर्वी केंबळी छप्पराचे होते, सदरचे घर नादुरुस्त झाले होते असे सांगितले आहे. वादी याने उलट तपासामध्ये वरीलप्रमाणे काही बाबी सांगितल्या असल्या तरी देखील त्याच्या या विधानावरुन प्रतिवादी क्र. १० याने त्याच्या स्वउत्पन्नातून सदर घराचे संपूर्ण बांधकाम केले असा निष्कर्ष काढता येणार नाही. प्रतिवादी क्र. १० याने स्वखर्चाने व स्वउत्पन्नातून सदरचा इमला बांधला याबाबत कसलाही पुरावा सादर करण्यात आला नाही. त्यामुळे अशा पुराव्या अभावी प्रतिवादी क्र. १ चा मुलगा प्रतिवादी क्र. १० याने सदर घराचे स्वउत्पन्नातून बांधकाम केले हे मुळीच शाबीत होत नाही. परिणमी मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. ४ करीता

१८. निशाण क्र. ४९ ला असलेल्या मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम कलम ३२म अन्वये दिलेल्या खरेदी प्रमाणपत्रावरुन दावा परिशिष्ट अ मधील सर्व्हे क्र. २७/२ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या नावे खरेदी घेण्यात आल्याचे दिसून येते. जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले नाही असे प्रतिवादी क्र. १ चे स्पष्ट कथन आहे. सदर मिळकतीची

खरेदी किंमत देण्यास प्रतिवादी क्र. १ याचे स्वतंत्र उत्पन्नाचे साधन होते असे त्याचे कथन नाही. यावरुन जिवबा व गोविंद यांचे एकत्र कुटूंब असताना या मिळकतीची खरेदी प्रतिवादी क्र. १ च्या नावे झालेली आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ तर्फे वादीला उलट तपासामध्ये दावा परिशिष्ट अ मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा देखील हिस्सा आहे असे सुचविण्यात आले आहे. यावरुन देखील सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ याची स्वसंपादीत कुळ वहिवाटीची मिळकत आहे असे मुळीच वाटत नाही.

१९. निशाण क्र. १३ ला असलेल्या फेरफार क्र. ३५६० वरुन सदर मिळकतीच्या अधिकार अभिलेखास जिवबा मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व वादीचे वडील भगवान यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येते. ज्याअर्थी सदर मिळकतीस प्रतिवादी क्र. १ व वादीचे वडील भगवान या दोघांच्या नावाची नोंद झाली आहे, त्याअर्थी सर्व्हे क्र. २७ हि.क्र. २ ही मिळकत एकत्र कुटूंबाची कुळ वहिवाटीची जमिन आहे असे वाटते. फेरफार क्र. ३५६० अन्वये झालेल्या सदरच्या नोंदी सन १९८४ साली झालेल्या आहेत व निशाण क्र. ४९ ला असलेले कलम ३२म चे प्रमाणपत्र हे सन १९९६ सालचे आहे. यावरुन सदर खरेदीप्रमाणपत्र होण्यापूर्वी सन १९८४ साली सदरची मिळकत वादीचे वडील व प्रतिवादी क्र. १ यांच्या नावाने नोंद होती किंबहूना सदर मिळकत जिवबा मयत होण्यापूर्वी जिवबाच्या नावाने नोंद होती हे स्पष्ट होते. यावरुन सदर मिळकत जिवबाच्या कारकिर्दीमध्ये कुळ वहिवाटीस होती हे स्पष्ट होते. सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ याने स्वतंत्रपणे कुळ वहिवाटीस घेतली होती, असे त्याने शपथेवर न्यायालयात येवून सांगितले नाही. त्याच्या तोंडी पुराव्याअभावी त्याने सदर मिळकत स्वतंत्रपणे कुळ वहिवाटीस घेतली यावर मुळीच विश्वास ठेवता येणार नाही. या सर्व पुराव्यावरुन सदर मिळकत केवळ प्रतिवादी क्र. १ याची स्वतंत्र कुळ वहिवाटीची मिळकत आहे हे मुळीच शाबीत होत नाही. परिणामी, मी मुद्दा

क्र. ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>**

२०. ग्रामपंचायत घर क्र. (३१३) ६१, (५९) १२, (५७) ११ हे सर्व इमले एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून बांधले आहेत, सबब, सदरील इमले या दाव्याच्या कामी सामील केल्याशिवाय सदरील दावा चालण्याजोगा नाही, अशी तक्रार प्रस्तुत प्रतिवादींनी घेतली आहे. मात्र सदरचे इमले एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून बांधले आहेत, याबाबतचा कसलाही पुरावा प्रतिवादींनी सादर केला नाही. अशा पुराव्याअभावी सदर इमले एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून बांधले आहेत हे शाबीत होत नाही. त्यामुळे सदर मिळकती या दाव्याच्या कामी आवश्यक मिळकती आहेत व या मिळकती समाविष्ठ केल्याशिवाय सदर दावा चालणेस पात्र नाही असे मला वाटत नाही.

२१. जिवबा व गोविंद यांच्यामध्ये वाटप झाले नाही असे प्रतिवादींचे कथन आहे. त्यामुळे निशाण क्र. ७५ ला असलेल्या फेरफार उता—यामध्ये नमूद असलेल्या सर्व्हे क्र. १९ हि.क्र. ४/५, सर्व्हे क्र. १९, हि.क्र. ४/७, सर्व्हे क्र. १७ हि.क्र. ३/५, सर्व्हे क्र. २७ हि.क्र. ४ या मिळकतीदेखील वादी प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत असे दिसून येते. मात्र या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ नाहीत असे दिसून येते. सदर मिळकती या दाव्यात समाविष्ठ नाहीत म्हणून केवळ दाव्यातील मिळकतींचे वाटप झाल्यास सदर वाटप बेकायदेशीर होईल असे मुळीच वाटत नाही. तसेच या मिळकती प्रस्तुत दाव्यात समाविष्ठ नाहीत म्हणून प्रस्तुतचा दावा रद्दबातल होईल असे देखील मला वाटत नाही. या दाव्यात समाविष्ठ नसणा—या वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप मागण्याचा उभय पक्षकारांना अधिकार आहे. त्यामुळे सदर मिळकती या दाव्यात समाविष्ठ नाहीत म्हणून दाव्यातील मिळकतींचे वाटपाचा दावा मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कसलेही

नुकसान होईल असे मला वाटत नाही. अशा परिस्थितीत सदर मिळकती या दाव्यात समाविष्ठ नाहीत म्हणून प्रस्तुत दावा फेटाळल्यास उभय पक्षकारांचे निश्चितच नुकसान होईल असे मला वाटते. त्यामुळे या मिळकती याकामी समाविष्ठ नाहीत म्हणून हा दावा रद्दबातल होईल असे मला वाटत नाही.

२२. मुल्ला यांच्या हिंदू लॉ विसावी आवृत्ती अनुच्छेद क्र. ३३२ मध्ये वाटपाच्या दाव्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती समाविष्ठ असणे आवश्यक आहे, मात्र अशा मिळकतींपैकी काही मिळकती गहाण ठेवल्या असतील किंवा काही मिळकती त्रयस्थ इसमाकडे असतील तर अशा मिळकतींबाबत स्वतंत्र वाटपाचा दावा दाखल करता येतो असे नमूद करण्यात आले आहे. सदर तरतूदीमध्ये काही वडीलोपार्जित मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ नाहीत म्हणून तसा दावा फेटाळणेस पात्र आहे अगर अशा दाव्याद्वारे झालेले वाटप बेकायदेशीर आहे असे नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे सदर तरतूदीअन्वये या दाव्यामध्ये सर्वच वडीलोपार्जित मिळकती समाविष्ठ केल्या नाहीत म्हणून सदर दाव्याद्वारे होणारे वाटप अवैध होईल असे मला वाटत नाही. परिणामी या कारणास्तव प्रस्तुत दावा फेटाळणेस पात्र आहे असे मला वाटत नाही. सबब, मी मुद्दा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

## <u>मुद्दा क्र. ६ करीता</u>

२३. वरील कारणमिमांसेवरुन व निष्कर्षावरुन संपूर्ण दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांचा हक्क व हिस्सा आहे असे दिसून येते. दावा मिळकतींमध्ये जिवबा व गोविंद यांचे शाखेंना प्रत्येकी १/२ हिस्सा प्राप्त होतो. जिवबा याचे वारस प्रतिवादी क्र. १ व भगवान यांना प्रत्येकी १/४ हिस्सा प्राप्त होतो. भगवान याचे वारस वादी, प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना प्रत्येकी १/२० हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांना

प्रत्येकी १/८ हिस्सा प्राप्त होतो असे मला वाटते. सबब, वादी हा त्याच्या वरील हिश्श्याचे वाटप होवून त्याप्रमाणे पृथक कब्जा मिळणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी मुद्दा क्र. ६ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदावत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>**

२४. मुद्दे क्र. २ व ६ चे निष्कर्ष होकारार्थी असल्यामुळे व मुद्दे क्र. १, ३ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी असल्यामुळे वाटपाचा दावा अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते.

२५. वादी व प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकतीचे सहमालक आहेत. एक सहमालक दुस—या सहमालकाविरुध्द त्यांच्या मिळकतीच्या कब्जे वहिवाटीबाबत निरंतर व्यादेशाची दाद मागणेस पात्र नाही असे कायदयाचे प्रचलित तत्व आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. १ विरुध्द मागितलेली निरंतर व्यादेशाची दाद मंजूर होणेस पात्र नाही असे मला वाटते. सबब, निरंतर व्यादेशाकरीता दावा फेटाळण्यास पात्र आहे. परिणामी या मुद्दयाच्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे :

– **<u>आदेश</u>** –

१. दावा अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. दावा मिळकतींमध्ये वादी, प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचा प्रत्येकी १/२० हिस्सा, प्रतिवादी क्र. १ चा १/४ हिस्सा, प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा प्रत्येकी १/८ हिस्सा आहे असे घोषित करण्यात येते.

३. निरंतर व्यादेशाकरीता दावा फेटाळण्यात येतो.

४. वादी, प्रतिवादींनी दाव्यात उद्‌भवलेला खर्च आपापला सोसावयाचा आहे.

५. येणेप्रमाणे दावा शेत मिळकतींचा हुकूमनामा व घर मिळकतींचा प्राथमिक हुकूमनामा आजपासून १५ दिवसाचे आत तयार करण्यात यावा.

६. घर मिळकतींचे वाटप न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करुन करण्यात यावे.

७. दावा शेत मिळकतींचे वरीलप्रमाणे वाटप करणेसाठी व त्यानुसार वादी, प्रतिवादी यांना स्वतंत्र कब्जा देण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे मा. जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग–ओरोस यांच्याकडे हुकूमनामा पाठविण्यात यावा.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २०, नियम १२ (क) नुसार वर नमूद पक्षकारांना दावा मिळकतीपैकी त्यांच्या हिश्श्येची मिळकत प्रत्यक्ष कब्जात मिळेपर्यंत दरम्यानच्या उत्पन्नाची चौकशी करण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखित व घोषित करण्यात आला.)

स्थळ : देवगड
दिनांक : ३०/०६/२०१७

( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.